नाशिक रिंगरोड प्रकल्पाच्या अनुषंगाने भूसंपादन व इतर संबंधीत बाबी तपासण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्रमांक:- विसता-२०२६/प्र.क्र.४४/भूसंपादन-०३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २३.०७.२०२६

वाचा:- महाराष्ट्र विधानमंडळाच्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनामध्ये उपस्थित तारांकित प्रश्न क्र. ३२६६५.

प्रस्तावना:-

मा. विधानसभेमध्ये दि.०९.०७.२०२६ रोजी चर्चेसाठी आलेल्या तारांकित प्रश्न क्र. ३२६६५ बाबत मा. विधानसभा सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्यांवर उत्तर देताना मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या आश्वासनानुसार नाशिक रिंगरोड प्रकल्पाच्या संरेखनामध्ये (Alignment) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्या मार्फत वेळोवेळी करण्यात आलेले बदल, त्याबाबतची समर्थनीय कारणमिमांसा तसेच प्रकल्पाशी निगडीत प्राथमिक अधिसुचनेच्या दिनांकापुर्वीच्या मागील ३ वर्षामधील प्रकल्प संरेखनामधील जमीनींच्या खरेदी विक्री व्यवहारांची चौकशी करण्यासाठी मा. अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक व नोदणी) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करण्यात येते आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

मा.अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक व नोदणी) यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीची रचना व कार्यकक्षा निश्चित करण्यात येत आहे.

अ) विशेष चौकशी समितीची रचना :-

१.	मा. अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक व नोदणी)	- अध्यक्ष
२.	विभागीय आयुक्त, नाशिक	- सदस्य
३.	नोंदणी महानिरिक्षक, पुणे	- सदस्य
४.	जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भुमी अभिलेख, पुणे	- सदस्य
५.	सह सचिव (भूसंपादन) महसूल विभाग	- सदस्य सचिव

ब) विशेष चौकशी समितीची कार्यकक्षा :- :-

१. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ यांच्यामार्फत सदर प्रकल्पाच्या संरेखनामध्ये वेळोवेळी करण्यात आलेले बदल तसेच त्याबाबतची कारणमिमासा / समर्थनियता इत्यादी बाबींची चौकशी करुन अहवाल शासनास सादर करणे.

२. नाशिक रिंग रोड या प्रकल्पाचा Detail Project Report तयार करणाऱ्या एजन्सीने ज्या भागात जमिनी खरेदी केल्या आहेत त्याबाबत प्राप्त तक्रारींची चौकशी करावी.

३. याशिवाय सदर प्रकल्पाशी निगडीत प्रकल्प संरेखनाच्या प्राथमिक अधिसुचना दिनांकाच्या मागील ३ वर्षाच्या कालावधीमध्ये सनदी अधिकारी, व्यापारी व इतर यांनी केलेल्या जमीनींच्या खरेदी विक्री व्यवहारांची, भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील अनुज्ञेयता व इतर बाबी विचारात घेऊन चौकशी करावी व याबाबतचा अहवाल शासनास १ महिन्यात सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२३१८०९३६९५४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MITHUN SITARAM METKARI

Digitally signed by MITHUN SITARAM METKARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=C5E8236705FDBCCA44E2729131D7F8ECF3D89986EF302C333A751DB3D8202DE1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F9CC4741E617C7D288990243652309A7CD19A13FD383DEF17B5669F6F383A116, cn=MITHUN SITARAM METKARI
Date: 2026.07.23 18:10:24 +05'30'

(मिथुन मेटकरी)
कक्ष अधिकारी, महसूल विभाग

प्रत:-

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
२) मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व अल्पसंख्यांक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महसूल, नोंदणी व मुद्रांक) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (महसूल, नोंदणी व मुद्रांक), मंत्रालय, मंबई
७) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक
८) जिल्हाधिकारी, नाशिक
९) जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भुमी अभिलेख, पुणे
१०) नोंदणी महानिरिक्षक, पुणे
११) निवडनस्ती (भूसंपादन-०३)